संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
12 NOV 2025
प्राप्त झाले सही....................

**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी नियमित करणेबाबत.**
**श्री. अरुण चां. कोल्हे, संचालक संवर्ग.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२५/प्र.क्र.१०८/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- १० नोव्हेंबर,२०२५.

**संदर्भ:-**

१) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२२/प्र.क्र.४३/कोषा प्रशा-२, दिनांक २२.०९.२०२२.
२) आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. वविशम / आस्था / ७१० / २०२३, दिनांक १९.०४.२०२३.
३) श्री. अरुण कोल्हे, सहसंचालक यांचे दिनांक २०.०४.२०२३ रोजीचे पत्र.
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / रोख / श्री. कोल्हे / ०७.२३ / ४२०, दिनांक ०६.०७.२०२३.
५) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म.(मर्या), मुंबई यांचे पत्र क्र.मरारविम/०२/प्रशासन/ ४६५९, दिनांक २६.०७.२०२३.
६) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.८६/कोषा प्रशा-२, दिनांक २१.०८.२०२३.
७) उप सचिव (ऊर्जा-२), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक १०.१०.२०२३ रोजीचे पत्र.
८) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको / रोख / का-१/ श्री. कोल्हे / संचालक प्रतिक्षाधिन अधिकारी/ २०२३/६९७ / २०३, दिनांक ०१.११.२०२३.
९) वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.८६/कोषा प्रशा-२, दिनांक २१.११.२०२३.
१०) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको / रोख / का-१/ श्री. कोल्हे/ संचालक प्रतिक्षाधिन अधिकारी/ २०२३/७४८, दिनांक २२.११.२०२३.
११) श्री. अरुण कोल्हे, सहसंचालक यांचे दिनांक ०४.०७.२०२४ रोजीचे पत्र.
१२) अतिरिक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. वविशम/आस्था/९४९/२०२४, दिनांक ३०.०७.२०२४.
१३) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको / प्रशा-राप / का.६/ श्री. कोल्हे /०२.२५ / १३७/०१२३, दिनांक १२.०२.२०२५.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहसंचालक संवर्गातील श्री. अरुण चां. कोल्हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वसई-विरार महानगरपालिका या पदावर कार्यरत असताना संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक २२.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येऊन श्री. कोल्हे यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई येथे पदस्थापना देण्यात आली.

२. श्री. कोल्हे यांना पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी संदर्भाधिन क्र.२ येथील आदेशान्वये दिनांक १९.०४.२०२३ (म.नं) रोजी त्यांना कार्यमुक्त केले.

३. श्री. कोल्हे पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यासाठी संदर्भाधिन क्र.३ येथील दिनांक २०.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांना विनंती अर्ज केला.

01396/2025/2013
13-11-25

मात्र, संदर्भाधिन क्र. ५ येथील दिनांक २६.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रशासकीय कारणास्तव श्री. कोल्हे यांना महामंडळाच्या "मुख्य लेखा व वित्त अधिकारी" या पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेणे शक्य नसल्याचे कळविले.

४. श्री. कोल्हे हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने संदर्भाधिन क्र.६ येथील दिनांक २१.०८.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. कोल्हे यांना संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित, मुंबई या पदावर सुधारीत पदस्थापना देण्यात आली.

५. श्री. कोल्हे यांनी त्यांच्या दिनांक २२.०८.२०२३ रोजीच्या अर्जान्वये सुधारीत पदस्थापनेवर हजर करुन घेण्यासाठी ऊर्जा विभागास विनंती केली. तथापि, ऊर्जा विभागाने सध्यस्थितीतील उपलब्ध कामकाज पाहता, श्री. कोल्हे यांना सुधारीत पदस्थापनेवर हजर करुन घेता येणार नसल्याचे संदर्भाधिन क्र.७ येथील दिनांक १०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

६. श्री. कोल्हे यांनी दिनांक १०.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये पुढील पदस्थापनेच्या प्रतिक्षित असल्याने दिनांक १०.१०.२०२३ (म.पू.) रोजी संचालनालयात हजर होत असल्याचे कळविले.

७. श्री. कोल्हे यांना दिनांक १०.१०.२०२३ (म.पू.) रोजीपासून संचालनालयात रुजू करुन घेण्यात येऊन त्यांना राष्ट्रीय सुचना केंद्र, पुणे यांच्याशी नवीन संगणकीकृत प्रणालीच्या विकसन प्रयोजनार्थ समन्वय साधण्याचे कामकाज संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. ८ येथील दिनांक ०१.११.२०२३ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आले.

८. तद्नंतर, संदर्भाधिन क्र.९ येथील दिनांक २१.११.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. कोल्हे यांना प्रशासकीय कारणास्तव वित्तीय सल्लागार व सह सचिव, मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर सुधारीत पदस्थापना देण्यात आली. त्यानुसार, श्री. कोल्हे यांना दिनांक २२.११.२०२३ (म.नं.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

९. श्री. कोल्हे यांना वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडून दिनांक १९.०४.२०२३ (म.नं.) रोजी येथून कार्यमुक्त केल्यानंतर ते दिनांक २२.११.२०२३ रोजीपर्यंत एकूण २१७ दिवस पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे.

१०. यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील श्री. अरुण चां. कोल्हे यांचे दिनांक २०.०४.२०२३ ते दिनांक २२.११.२०२३ रोजीपर्यंतच्या एकूण २१७ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता आहरण व संवितरण अधिकारी, मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) आहरण व संवितरण अधिकारी, मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई *
६) श्री.अरुण चां. कोल्हे, वित्तीय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)